**दिनांक 01/09/2025**

# प्रेसनोट

## अवैध व्यवसाय विरोधी अभियान - 04

## नांदेड परिक्षेत्रात ऑगस्ट महिन्यात आणखी 1155 कारवाया, 03 कोटी रुपयांचा मुद्येमाल जप्त

परिक्षेत्रात सुरु असलेल्या अवैध दारु, मटका, जुगार, ऑनलाईन लॉटरी, क्रिकेट बेटिंग, गुटखा, अंमली पदार्थ, वेश्याव्यवसाय, वाळु उपसा व वाहतुक, अवैध प्रवासी वाहतूक इत्यादींना आळा घालण्यासाठी, पोलीस उपमहानिरीक्षक श्री शहाजी उमाप यांनी दिनांक 1 मे पासुन नांदेड परिक्षेत्रात अवैध व्यवसाय विरोधी अभियान सुरु केले आहे.

पोलीसांनी, नांदेड परिक्षेत्रात मे, जुन व जुलै महिन्यात राबविलेल्या अवैध व्यवसाय विरोधी अभियान -1, अभियान -2 व अभियान -3 दरम्यान, अवैध व्यवसायांत गुंतलेल्या 6163 इसमांचे विरुध्द एकूण 5618 केसेस करुन 27,40,55,793/- रुपयांचा मुद्येमाल हस्तगत केला होता.

सदर कारवाईनंतर, परिक्षेत्रात, ऑगस्ट महिन्यात अवैध व्यवसाय विरोधी अभियान - 4 राबविण्यात आले होते. सदर अभियाना दरम्यान, नांदेड परिक्षेत्रात अवैध व्यवसायिकांविरुध्द आणखी 1155 केसेस करुन त्यांच्याकडून 03 कोटी रुपयांचा मुद्येमाल हस्तगत करण्यात आला आहे. ऑगस्ट महिन्यात परिक्षेत्रातील चारही जिल्हयांनी केलेली कामगिरी खालीलप्रमाणे आहे.

| अ.क्र. | जिल्हा | एकूण केसेस | आरोपी संख्या | जप्त मुद्येमाल |
|---|---|---|---|---|
| 1. | नांदेड | 310 | 443 | 1,01,23,070 |
| 2. | परभणी | 297 | 378 | 62,66,743 |
| 3. | लातूर | 230 | 367 | 1,34,51,556 |
| 4. | हिंगोली | 318 | 330 | 40,61,265 |
| | **एकूण** | **1155** | **1518** | **3,39,02,634** |

उपरोक्त कारवाई दरम्यान, पोस्टे किनगाव जि. लातूर यांनी 16,01,100/- रुपयांचा गुटखा जप्त करून चांगली कामगिरी केली आहे. सदर कामगिरी बाबत, पोलीस उप महानिरीक्षक यांनी त्यांचे अभिनंदन केले आहे.

**(53) अवैध व्यवसायिक हद्यपार, तर एकावर MPDA अंतर्गत कारवाई** :

आजवर राबविण्यात आलेल्या चार अभियानांतर्गत, अवैध व्यवसायांत गुंतलेल्या (53) इसमांना परभणी, लातूर व हिंगोली पोलीसांनी हद्यपार केले असुन, नांदेड पोलीसांनी हातभटटी दारु व्यवसायाशी निगडित एका इसमास (MPDA) कायद्याखाली एक वर्षासाठी स्थानबध्द केले असुन, दिनांक 17/06/2025 रोजी त्याची रवानगी छत्रपती संभाजीनगर कारागृहात करण्यात आली आहे.

दिनांक 1 सप्टेंबर पासून परिक्षेत्रातील अवैध व्यवसायांचे समूळ उच्चाटन करण्यासाठी **अवैध व्यवसाय विरोधी अभियान** - 5 राबविण्यात येत असून, संपुर्ण सप्टेंबर महिन्यात हे अभियान सुरु राहील. सदर मोहिमेदरम्यान, गुटखा बंदीसाठी वाहन व साठवणूक ठिकाणांच्या तपासणीची व्यापक मोहिम हाती घेण्यात येणार आहे.

**अवैध व्यवसायांची माहिती देण्यासाठी ' खबर ' या नावाने नवीन हेल्पलाईन** :

नागरिकांना अवैध व्यवसायांची माहिती देणे सुकर व्हावे म्हणून परिक्षेत्रीय कार्यालयाकडून **91 50 100 100** हा मोबाईल क्रमांक असलेली ' **खबर** ' ही हेल्पलाईन उपलब्ध करुन देण्यात आली असून नागरिकांनी अवैध व्यवसायांची माहिती सदर हेल्पलाईनवर फोन करुन किंवा व्हॉटसअॅपवर दयावी, माहिती देणा-या व्यक्तीचे नाव गोपनीय ठेवण्यात येईल, असे स्पष्ट करण्यात आले आहे.

आपल्या भागातील अवैध व्यवसायांची माहिती, नागरिकांनी नजीकच्या पोलीस ठाण्यास अथवा पोलीस उप महानिरीक्षक कार्यालयाच्या **nandedrange.mahapolice.gov.in** या संकेतस्थळावर किंवा **91 50 100 100** या हेल्पलाईनवर कळवून अशा अवैध व्यवसायांचा बिमोड करण्यासाठी आपला हातभार लावावा, असे आवाहन नांदेड परिक्षेत्राचे पोलीस उप महानिरीक्षक श्री शहाजी उमाप यांनी केले आहे.

कार्यालय पोलीस उप महानिरीक्षक,
नांदेड परिक्षेत्र, नांदेड